# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ०५/०६/२०२४ (बुधवार) सायंकाळ**

---

### खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक

पोस्टे कळमेश्वर अंतर्गत मौजा कळमेश्वर सरदार मोहल्ला व्यायाम शाळे जवळ दिनांक ०४/०६/२०२४ चे सकाळी १०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– राजेंद्र उर्फ राजा अशोक पुसदकर, वय २५ वर्ष, रा. हुडको कॉलोनी वार्ड क्र. १४ कळमेश्वर याचे पानठेल्याचे उधारी **आरोपी नामे– कुलाण दिलीप डांगे, वय २५ वर्ष रा. हुडको कॉलोनी दुर्गा मंदीर जवळ कळमेश्वर** याच्या कडे असल्याने दि. ०३/०६/२०२४ चे रात्री ०९/३० वा. सुमारास फिर्यादीला आरोपी दिसल्याने त्यास उधारीचे पैसे मांगितले तेव्हा त्याने फिर्यादी पैसे दिले नाही व तो फिर्यादीला शिवीगाळ करून झगडाभांडन केले. दि. ०४/०६/२०२४ चे सकाळी १०/०० वा. सुमारास फिर्यादी कळमेश्वर सरदार मोहल्ला, व्यायाम शाळे जवळ असतांना पाठीमागुन आरोपीने येवुन आलु शिलाचे चाकुने पाठीवर मानेवर व गळयाचे उजव्या बाजुला व उजव्या कानाजवळ मारून जखमी केले उजवे हाताचे मनगटावर व डावे हाताचे तळहातावर मारून जखमी केले आहे व पुन्हा त्याने शिवीगाळ करून पुन्हा मारण्याची धमकी दिली आहे. आरोपी याने पानठेल्याचे उधारीचे पैसे का मांगितले या कारणावरून शिवीगाळ करून आलु शिलाचे चाकुने जिवानीशी ठार करण्याचे उद्देशाने मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे कळमेश्वर येथे आरोपीविरूद्ध कलम ३०७, ५०४, ५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद असुन आरोपीस अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कळमेश्वर येथील ठाणेदार पोनि योगेश कामाले, पोउपनि मनोज टिपले, पोहवा गंगाधर ठाकरे, पोशि नुमान शेख यांनी पार पाडली.

# (मिसिंग)
## हरविलेल्या मुलीचा शोध होणेबाबत

कु. आशा प्रेमसिंग सय्याम, वय १७ वर्षे, ०८ महिने, रा. हेटीटोला पोस्ट मनसर ता. रामटेक हिला दि. १४/०१/२०२४ रोजी १५.०० वा. सुमारास यातील आरोपी नामे– सोनु प्रेमसिंग चितोडीया, वय २५ वर्ष, रा. हेटीटोला पोस्ट मनसर ता. रामटेक याने फुस लावुन एका पांढऱ्या रंगाच्या कारमध्ये घेवुन गेला. त्यानंतर तिचा शोध घेतला असता मिळुन आली नाही. बेपत्ताचे वर्णन– रंग गोरा, उंची ०४ फुट १० इंच, बांधा सडपातळ, केस काळे व कमरेपर्यंत लांब, नाक लांब, चेहरा लांब, अंगात कपडे पांढऱ्या रंगाचा फुल सलवार सुट त्यावर निळया रंगाचे फुल असलेले, गळयात पांढऱ्या रंगाचा दुपट्टा/ओढनी, ओळखचिन्हे गालावर डाव्या बाजूला डाग, नाकावर डाग, उजव्या हाताचे करंगळीवर गोंदन.

याबाबत कोणालाही माहिती असल्यास पो.स्टे. रामटेक येथील ठाणेदार पोनि. श्री. प्रशांत काळे मो.क्र. ९९२३२८६२२४ पोलीस उपनिरीक्षक श्री कार्तिक सोनटक्के मो.क्र. ९४०५९०३५२८ किंवा टेलीफोन क्र. ०७११४–२५५०७८ वर कृपया संपर्क साधावा. याप्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. रामटेक येथे कलम ३६३ भादंवि अन्वये गुन्हा नोंद केलेला आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर